# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १७/०९/२०२१**

## जिल्हा : पुणे

### मागील आठवडयाचे हवामान :

**मागील आठवडयाचे हवामान :** पुणे परिसरात मागील आठवडयात कमाल तापमान २७.० ते २९.० अंश सेल्सिअस तर किमान तापमान २१.० ते २२.७ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ८० ते ९३ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ६० ते ९५ टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ४.१ ते ६.९ कि.मी. होता.

**हवामान अंदाज :** पुढील पाच दिवसात पुणे जिल्ह्यात कमाल तापमान २८ ते २९ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २१ ते २२ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ८८ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ६० टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ०९ ते १४ कि.मी. दरम्यान राहील. आकाश ढगाळ राहील. वाऱ्याची दिशा नैॠत्तेकडून ईशान्येकडे राहील.

| मागील आठवड्यातील हवामान (१०/०९/२०२१ ते १६/०९/२०२१) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१७/०९/२०२१ ते २१/०९/२०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | दिनांक | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 5.9 | 3.1 | 9.1 | 4.8 | 0.5 | 0.9 | 0.3 | पाऊस (मिमी) | 5 | 1 | 4 | 11 | 13 |
| 27 | 28.5 | 29 | 28.8 | 28 | 29 | 28.8 | कमाल तापमान (अं.से.) | 29 | 29 | 28 | 28 | 28 |
| 21 | 21.5 | 22.4 | 22.2 | 21.1 | 22.7 | 21.2 | किमान तापमान (अं.से.) | 21 | 22 | 22 | 22 | 22 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 7 | 7 | 7 | 6 | 8 |
| 87 | 87 | 88 | 93 | 80 | 82 | 81 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 89 | 89 | 86 | 89 | 87 |
| 76 | 95 | 72 | 75 | 67 | 60 | 60 | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 59 | 55 | 55 | 64 | 66 |
| 4.1 | 5 | 4.4 | 5.1 | 6.5 | 6.9 | 4.4 | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 9 | 10 | 11 | 11 | 14 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 247 | 257 | 260 | 253 | 253 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १७, १८ व १९ सप्टेंबर, २०२१ रोजी हवामान ढगाळ राहून तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून दिनांक २० व २१ सप्टेंबर, २०२१ रोजी हवामान ढगाळ राहून काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र विभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक १९ ते २५ सप्टेंबर, २०२१ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वतःची, काढणी केलेल्या पिकाची व धान्याची तसेच आपल्या जनावरांची काळजी घ्यावी व जनावरे सुरक्षीत ठिकाणी बांधावीत.<br>• जिल्ह्याच्या पूर्वेकडील भागात पडणा-या पावसाचे पाणी शेतात साठवण्यासाठी/ मुरविण्यासाठी |

| | | |
|---|---|---|
| | | उपाय योजना करावी.<br>• पावसाचा अंदाज पाहून व पावसाची उघडीप बघून पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करावी.<br>• जिल्हयाच्या घाट क्षेत्रातील भागात पडणाऱ्या पावसाचे पाणी शेतात, उभ्या पिकात साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |
| भात | फुलोरा | भात पिकात झिंकची कमतरता आढळून आल्यास अशा ठिकाणी ०.२ % झिंक सल्फेट प्रति लिटर पाण्यातून द्यावे. ज्या ठिकाणी लागवड केलेली रोपे फुलोरा अवस्थेत आहेत तिथे १० सेमी पाण्याची पातळी ठेवावी .ढगाळ व दमट हवामानामुळे भात पिकावर कडा करपा, पर्ण करपा, तपकिरी ठिपके रोगाच्या नियंत्रणासाठी कॉपरओक्झीक्लोरायिड २५ ग्राम प्रति १० लि . पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. द्रावणात स्टिकर ०.१ टक्के (चिकटद्राव्य, १ मिली प्रती ग्रम प्रती लिटर पाणी) मिसळून फवारणी करावी. भात पिकात पाने गुंडाळणाऱ्या अळीने आर्थिक नुकसानाची पटली (२ प्रदुर्भावीत पाने प्रती चूड) ओलांडल्यानंतर शिफारशीत फवारणी लगेच करावी. पाने गुंडाळणारी अळी, खोड कीड आणि तुडतुडे याच्या नियंत्रणाकरिता ५ टक्के निंबोळी अर्काची पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. |
| वांगी | पिक वाढीची अवस्था | सध्याच्या ढगाळ हवामानामुळे पिकावर शेंडा व फळ पोखरणारी अळीच्या नियंत्रणासाठी क्लोरॅन्त्रानिलीप्रोल १८.५ टक्के एस.सी., ४ मिली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. |
| सोयाबीन | शेंगा भरणे | विविध प्रकारच्या किडींच्या/ अळींच्या नियंत्रणासाठी पिकामध्ये एकरी ८ ते १० पक्षी थांबे उभारावेत. सोयाबीन पिकावर पाने खाणाऱ्या स्पोडोप्टेरा अळीच्या उपद्रवाचा आगाऊ अंदाज घेऊन नुकसान टाळण्यासाठी हेक्टरी ५ स्पोडोलूरचा वापर करण्यात आलेले फेरोमेन सापळे, नियंत्रणासाठी अंडी समुहांचा तसेच समुहाने आढळणा-या अळ्यांचा वेळीच नायनाट केल्यास रासायनिक किटकनाशकांचा वापर टाळता येतो. आद्रतायुक्त वतावरणामुळे तांबेरा ह्या बुरशीजन्य रोगा च्या नियंत्रणासाठी प्रोपिकोन्याझोल किंवा हेक्झाकोन्याझोल १० मिली प्रती १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| तुर | फांद्या फुटण्याची अवस्था | किडीच्या प्रादुर्भावाचा अंदाज घेऊन प्रती हेक्टरी ५ या प्रमाणात कामगंध सापळे लावावेत. शेतात पाणी साचू न देता अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. आवशक्यतेनुसार कोळपणी किंवा खुरपणी करावी त्यामुळे जमिनीतील ओलावा व अन्न्द्रव्यासाठी पिकांची परस्परांशी स्पर्धा होणार नाही. |
| मुग व उडीद | शेंगा भरणे पक्व अवस्था | मूगाच्या शेंगा ७५ टक्के वाळल्यावर पहिली तोडणी करावी व त्यानंतर ८-१० दिवसांनी राहिलेल्या सर्व शेंगा तोडाव्यात. काढलेले पिक सुरक्षित ठिकाणी ठेवावे. शेंगा खळयावर चांगल्या वाळल्यावर मळणी करावी. उडदाची कापणी करून खळयावर आणून त्याची मळणी करावी. उडदाच्या शेंगा तोडण्याची गरज भासत नाही. साठवणीपुर्वी मूग / उडीद धान्यास ५-६ दिवस ऊन द्यावे. साठवण कोंदट व ओलसर जागेत करू नये. साठव ताना कडुनिंबाचा पाला ५ टक्के धान्यात मिसळावा. त्यामुळे साठवणीत कीड लागत नाही. |
| मका | फुलोरा अवस्था | पिकावर अमेरिकन लष्करी आळीचा १० % पेक्षा जास्त प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी क्लोरानट्रानिलीप्रोल १८.५ एस.सी . ४ मिली प्रती १० लिटर पाण्यातून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. कणसे पोखरणारी अळी- प्रादुर्भाव होऊ नये यासाठी पिक स्त्री-केसर येण्याच्या अवस्थेत असताना शेतात ट्रायकोग्रामा चीलोनीस या परोपजीवी किटकाचे अंडीपुंज सोडावेत. |
| भाजीपाला पिके | | सध्या आद्रतायुक्त हवामानामुळे या हंगामातील मिरची, वांगी, टोमॅटो, भेंडी, कांदा, भोपळा, कारली या पिकांच्या पानांवरील करपा , फळकुज आणि फांद्या वाळणे या बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी डायफेनकोनॅझोल १० मिली किंवा ॲझोक्झीस्ट्रोबीन १० मिली किंवा हेक्झाकोनॅझोल १० मिली किंवा टेब्युकोनॅझोल १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून दर १० दिवसांच्या अंतराने तीन ते चार फवारण्या आलटून पालटून कराव्यात. तसेच या पिकांवर भूरी रोगाचा प्रादुर्भाव दिसताच |

| | | |
|---|---|---|
| | | पाण्यात विरघळणारे गंधक २५ ग्रॅम किंवा टेब्युकोनॅझोल १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून २-३ फवारण्या दर १५ दिवसांच्या अंतराने कराव्यात. |
| आंबा | | सध्याच्या ढगाळ व दमट हवामानामुळे आंबा पिकावर नविन फुटीवरील किड व रोगांच्या नियंत्रणासाठी लॅमडा सायहेलोथ्रीन ५ % ई सी ६ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारावे. |
| केळी | पिक वाढीची अवस्था | सध्याच्या ढगाळ, उष्ण व दमट हवामानामुळे केळीवरील करपा (सिगाटोका) रोगाच्या नियंत्रणासाठी रोगग्रस्त पानाचा भाग/ पाने काढून जाळावीत. रोगाची लक्षणे दिसताच प्रोपीकोन्याझोल ५ मिली. व मिनरल ओईल १०० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी त्यानंतर २० दिवसाच्या अंतराने २ फवारण्या कराव्यात. |
| डाळिंब | फळ वाढीची अवस्था | फळधारण बागेत, फक्त फळ वाढीच्या अवस्थेत तेलकट डाग व्यवस्थापणासाठी कॉपर हायड्रोक्साइड ५३.८% २० ग्रॅम + स्ट्रेप्टोसायक्लीन १००% ५ ग्रॅम + ब्रोनोपॉल ९५ - ९८ % ५ ग्रॅम + स्प्रेडर स्टीकर ५ मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | रोगप्रसार होऊ नये यासाठी रोगी जनावर वेगळी ठेवातीत. रोगी जनावरांचे मल-मूत्र दूर नेऊन टाकावे. सर्व निरोगी जनावरांना लाळ खुरकत रोगाची प्रतिबंधक लस टोचावी. पावसाळ्यात गवत जास्त प्रमाणात खाल्ले गेल्यास जनावरांची अन्नपचनाची क्रिया बिघडते व त्यांना हगवण लागते. त्यामुळे पावसाळ्यामध्ये चराऊ जनावरांच्या आहारात वाळलेल्या चाऱ्याचे प्रमाण तुलनात्मकरित्या अधिक ठेवावे. जनावरांना पोटातील जंताच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक पाजावे. जनावरांना रोग प्रतिबंधक उपाय म्हणून पशु वैद्यकाच्या सहाय्याने योग्य वेळी लसीकरण करून घ्यावे तसेच जनावरांना व पक्ष्यांना नेहमी पिण्यास स्वछ व थंड पाणी द्यावे. |
| ***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.** | | |

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : १७.०९.२०२१

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**